# शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय
# यवतमाळ

DHAMANGAON ROAD YAVATMAL PIN- 445001

जाक्र/शाअभिमय/विवि/2022/ 1962
दिनांक- 08/09/022

## सूचना

**विषय – शैक्षणिक वर्ष 2022-23 करिता द्वितीय,तिसरे व अंतिम वर्षाच्या विदयार्थ्यांचे विषम सत्राच्या विदयार्थ्यांच्या अनुपस्थिती बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये द्वितीय,तिसरे व अंतिम वर्षाला प्रवेशित होणा-या सर्व विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते की, **विषम सत्र 2022-23 हे DBATU लोणेरे हयांच्या वेळापत्रकानुसार व संस्थेच्या वेबसाईटवर प्रकाशित केलेल्या ॲकेडेमीक कॅलेंडर नुसार दि.01/09/2022 पासुन सुरु झालेले आहे.** सर्व विदयार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये Provisionally प्रवेश देण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे हजेरी घेणे सुरु असुन विदयार्थ्यांची 01/09/2022 पासुन ची उपस्थितीचे आधारेच विदयार्थ्यांना विषम सत्र 2022-23 साठी अंतिम प्रवेश (Final Admission) दिल्या जाईल.परंतु असे निदर्शनास आले आहे की, वर्ग मागील आठ दिवसांपासुन सुरु होवुन देखील काही विदयार्थ्यी तासिकेमध्ये गैरहजर आहेत.

**Academic calendar 2022-23 नुसार विदयार्थ्यांनी खालील बाबी लक्षात घ्याव्यात .**

1.Academic Calender नुसार विदयार्थ्यांची CA-1 test ही दिनांक 01/10/2022 ते 04/10/2022 हया कालावधीत घेण्यात येणार असुन त्याकरिता 25% ते 30% टक्के अभ्यासक्रमाचा समावेश असणार आहे.

2..विदयार्थ्यांची 01/09/2022 पासुन ची उपस्थिती ग्राहय धरुन विषम सत्राची एकुण उपस्थिती 75% पेक्षा कमी असल्यास विदयार्थ्यांना सदर सत्राकरिता थोपवणुक (Detain ) करण्यात येईल.

3.ज्या विदयार्थ्यींनींना महाविदयालयाच्या वस्तीगृहात प्रवेश मिळालेला आहे अश्या विदयार्थ्यींनीचे उपस्थिती प्रमाण कमी असल्यास त्यांचा वस्तीगृह प्रवेश रदद करण्यात येईल.

वरील सर्व बाबी विचारात घेता विदयार्थ्यांनी **दि.12/09/2022** पासुन नियमित पणे संस्थेमध्ये उपस्थित राहुन तासिका व प्रात्याक्षिके करणे अनिवार्य असुन तसे न केल्यास होणा-या सर्व प्रकारच्या शैक्षणिक नुकसानीस विदयार्थ्यी स्व् त : जबाबदार राहतील. **गैरहजर असणा-या विदयार्थ्यांनी महाविदयालयात हजर होतांना त्यांचे दि.01/9/2022 ते दि.9/9/2022 या कालावधीतील अनुपस्थिती बाबतचे पालकांचे पत्र आणावे.त्याशिवाय तासिकेत प्रवेश दिल्या जाणार नाही. पालकांचे बनावटी/खोटे पत्र आणल्यास कार्यवाही करण्यात येईल. हयाची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**प्राचार्य**
**शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय**
**यवतमाळ.**

**प्रत- 1 ) सर्व विभाग प्रमुख CE/ME/EE/COM/E&TC यांनी सदर सुचना विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणावे.**
**2) सुचना फलक शास.अभियांत्रिकी .महा यवतमाळ**
**3) प्रोग्रामार ,संकेतस्थळावर प्रसिदधी करण्याकरिता.**

Government College of Engineering Yavatmal